संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०
नि. क्र. १९ लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – रमेश काशीनाथ तेटांबे,

**वय**– ६८ वर्षे , **व्यवसाय** – खाजगी व्यवसाय,

**राहणार**– मु.पो. सावर्डे, ता. चिपळून, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी एस. आर. वनकर यांचेकडून –**

०१. देवरुख येथे सर्व्हे नंबर १८ हिस्सा नं. ०७ येथे माझी 'मार्लेश्वर प्रसाद' नावाची इमारत आहे. त्या इमारतीचे बांधकाम २०१४–२०१५ साली सुरु होवून २०१७ साली पूर्ण झाले. त्या इमारतीत एक तळमजला व इतर तीन मजले असे एकूण ०४ मजले आहेत. तळमजल्यावर व्यापारी गाळे असून त्या इमारतीत एकूण २३ सदनिका आहेत.

०२. दिनांक १२/०४/२०१८ रोजी आरोपी नयना यादव ही सदनिका घेण्यासाठी माझ्याकडे आली होती. त्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ०९ च्या खरेदीविक्रीबाबत माझा व आरोपीचा व्यवहार ठरला. त्या व्यवहारापोटी नयना यादव हिने मला बँक ऑफ इंडिया शाखा, देवरुख चे प्रत्येकी २,००,०००/– रुपयांचे दोन धनादेश दिले. सदरच्या खात्यात पैसे नसल्यामुळे ते दोन्ही धनादेश बाउंस झाले.

०३. त्यानंतर दिनांक १५/०४/२०१९ रोजी आरोपी नयना यादव मला परत भेटली. त्यावेळी तिने मला सांगितले की, तिला सदनिका क्र. ०९ व १० या दोन्हीही सदनिका खरेदी करायच्या आहेत. त्या व्यवहारापोटी तिने मला स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, देवरुख चे प्रत्येकी २०,००,०००/– रुपयांचे दोन धनादेश व १०,००,०००/– रुपयांचा एक धनादेश असे एकूण तीन धनादेश दिले. त्या तीन्ही धनादेशांची तारीख १५/०४/२०१९ अशी होती. सदरचे धनादेश बँकेत

क्लीअरींगसाठी टाकले असता आरोपीच्या खात्यात रक्कम नसल्याने ते धनादेश परत आले.

०४. मी आरोपीला त्याबाबत विचारले. त्यावर आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत होती. ती भेटत नव्हती. ती सांगत होती की, ''रक्कम देते, माझ्या खात्यात रक्कम टाकल्यावर सांगते''.

०५. दिनांक २४/११/२०१९ रोजी दुपारी १२.१५ च्या सुमारास आरोपी नयना हिने सदनिका क्र. ०९ व १० चे लॉक तोडून आत अतिक्रमण केले. मी त्याबाबतची फिर्याद पोलीस ठाणे देवरुख येथे दिली. त्यानंतर पोलीस तेथे पंचनाम्यासाठी आले. दिनांक २४/११/२०१९ रोजी मी सावर्डे येथे होतो. मला घटनेबाबत काही लोकांनी सांगितले. त्यावरुन मी सावर्डे येथून आलो होतो. मी येतेवेळेसच देवरुख येथील पोलीसांना फोन लावून घटनेची खबर दिली होती. मी देवरुख येथे आल्यावर पोलीस माझ्यासोबत तेथे आले. त्यांनी तेथे वस्तुस्थितीचा पंचनामा केला. मी इमारतीच्या ठिकाणी पोलीसांसोबत दुपारी ०१.०० वाजता गेलो होतो. मी सावर्डेहून आल्यावर अगोदर पोलीस ठाण्यात गेलो व तेथे फिर्याद दिली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर फिर्यादला **निशाणी २६** देण्यात आली).

०६. आरोपी नयना यादव आज न्यायालयात हजर आहे.

**भारतीय साक्षी पुरावा अधिनियमचे कलम १६५ अन्वये साक्षीदारास न्यायालयाकडून प्रश्न–**

**प्रश्नः** तुम्ही सावर्डे येथून आलात त्यावेळी तुमच्या सोबत कोण–कोण होते?

**उत्तरः** त्यावेळी माझ्यासोबत माझा ड्रायव्हर अविनाश भिकाजी टाकळे हा होता.

**प्रश्नः** दिनांक २४/११/२०१९ रोजी तुमची पत्नी रेखा कोठे होती?

**उत्तरः** त्यादिवशी ती सावर्डे येथे होती. ती दुसऱ्या दिवशी देवरुखला आली होती.

**प्रश्नः** नयना यादव यांच्याशी तुम्ही काही लेखी करार केला होता का?

**उत्तरः** नाही.

**प्रश्नः** सदनिका क्र. ०९ व १० च्या खरेदी विक्रीची एकूण किंमत किती होती?

**उत्तरः** रुपये ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख).

**प्रश्नः** ताबा देण्याबाबत तुमचे काय ठरले होते?

**उत्तरः** खरेदीखत झाल्यानंतरच त्या सदनिकेचा ताबा देणार असे ठरले होते.

**प्रश्नः** तुम्ही ते परत आलेले धनादेश तपासा दरम्यान पोलीसांना दिले होते काय?

**उत्तरः** नाही, मी रत्नागिरी येथील न्यायालयात सदनिका क्र. ०९ व १० बाबत केस दाखल केलेली आहे. ती केस अतिक्रमण व धनादेश बाउंस झाल्याप्रकरणी दाखल केली आहे.

**प्रश्नः** त्याबाबत एकच केस केलेली आहे की वेगवेगळया?

**उत्तरः** त्याबाबत एकच केस केली आहे.

**प्रश्नः** ती केस तुम्ही कधी दाखल केली आहे?

**उत्तरः** ती केस २०१९ साली दाखल केली आहे.

**प्रश्नः** तुम्ही त्या केसचा क्रमांक सांगू शकता का?

**उत्तरः** नाही.

**प्रश्नः** तुम्ही त्या केसबाबतचे काही कागदपत्रे सादर करु शकता का?

**उत्तरः** आज नाही, नंतर करु शकतो.

**प्रश्नः** त्या केस मध्ये तुमची नेमकी मागणी काय आहे?

**उत्तरः** मी सदनिका क्र. ०९ व १० चा ताबा मागितलेला आहे.

**(त्या केस संबंधीचे दस्त न्यायालयात पुढील तारखेपर्यंत हजर करण्यात यावे अशी समज साक्षीदारास देवून पुढील तारीख ०६/०२/२०२४ असल्याचे साक्षीदारास निर्देशीत करण्यात आले).**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

**स्वाक्षरीत/–**

(ब. द. तारे)

दि. १६.०१.२०२४

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in (in SC.C. No. 200/2020)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 16/01/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 16/01/2024 |
| Evidence uploaded on | :- | 16/01/2024 |